# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील पोलीसांना घरे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१) ८७९४८ (०४-०९-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न, वस्त्र, निवारा या मानवी मुलभूत गरजांच्या अंतर्गत राज्यातील पोलीसांना घरे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सुमारे १ लाख २० हजार तर मुंबईत २२ हजार ७८५ पोलीस कर्मचारी शासकीय निवासापासून वंचीत असल्याने शासनाने पोलीसांना घरे देण्याच्या निर्णयात्मक योजनेतून अद्यापपर्यंत घरे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) व (२) पोलीस कर्मचारी व अधिकारी यांना पुरेशा प्रमाणात शासकीय निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पोलीस गृहनिर्माणकरिता ४.००, ३.०० आणि २.५० एफ.एस.आय. लागू करण्याबाबतची शासन अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. त्या अनुसार महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, यांच्यामार्फत गृहनिर्माणाकरिता कार्यवाही करण्यात येत असून अनेक प्रकल्प नियोजन स्तरावर, निविदा स्तरावर आणि प्रगतीपथावर आहेत. या अंतर्गत ३९४८ इतक्या निवासस्थानांचे काम प्रगतीपथावर, ६२९० निवासस्थानांसाठी निविदा स्तरावर, १२५०६ निवासस्थानांसाठी नियोजन स्तरावर आहे.

तसेच, पोलीस कर्मचारी यांना घर बांधणी/ खरेदीकरिता अग्रीम देता यावा म्हणून बँकेकडून कर्ज सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिकमध्ये बोगस रेशनकार्ड, जातीचे, शाळा सोडल्याचे व उत्पन्नाचे दाखले देण्यात येत असल्याबाबत**

**(२) ८९३८२ (१९-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकमध्ये प्रांताधिकारी व तहसिलदारांच्या बनावट शिक्क्याव्दारे बनावट रेशनकार्ड, जातीचे दाखले व शाळा सोडल्याचे दाखले देण्यात येत असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात महसुल विभागातील कर्मचा-यांच्या संगनमताने ही दाखले देणारी टोळी कार्यरत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर गुन्ह्याच्या तपासात असे काही आढळुन आलेले नाही.

(३) व (४) पंचवटी पोलीस स्टेशन हद्दीत प्रांताधिकारी व तहसिलदाराच्या बनावट शिक्क्याद्वारे रेशनकार्ड, बनावट उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले इत्यादी बनावट दाखले तयार करुन देणा-या विरुद्ध दि.१०/०४/२०१७ रोजी गु.र.नं. १४३/२०१७ भा.दं.वि.क. ४२०, ४६५, ४६६, ४६८, ४७३, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

**मुंबई शहर व उपनगरात रुग्णवाहिकांसाठी 'ग्रीन कॉरीडॉर' करण्याची योजना अंमलात आणण्याबाबत**

**(३) ९४८५४ (१५-०९-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील प्रचंड वाहतूक कोंडीमुळे ‘गोल्डन अवर’ मध्ये रुग्णांना वेळेवर वैद्यकीय सहाय्य मिळण्यात अडचणी येत असल्याने मुंबई शहर व उपनगरात रुग्णवाहिकांसाठी ‘ग्रीन कॉरीडॉर’ करण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात सदरहू योजना कार्यान्वित करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१), (२) व (३) अशा प्रकारच्या योजनेसंबंधीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही. परंतु सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई यांचे कार्यालयामार्फत ग्रीन कॉरीडॉर सुविधा नागरिकांना विशेष बाब म्हणून अवयव प्रत्यारोपणावेळी किंवा गंभीर आजारी असलेल्या रुग्णांसाठी रुग्णालयाने किंवा नागरीकांनी विनंती केल्यावरुन देण्यात येते. तसेच नैसर्गिक/अनैसर्गिक आपत्तीच्या वेळी जखमी रुग्णांना रुग्णालयात पाहोचविण्यासाठी मदतकार्य करणाऱ्या शासकीय यंत्रणांना सदरची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

माहे ऑगस्ट, २०१५ पासून मुंबई शहरात रोपण करण्यासाठी हृदय एखाद्या रुग्णालयात पोहाचविण्याचे असल्यास ते कमीत कमी वेळेत पाहचावे याकरीता ते घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेला प्राधान्यापणे रस्ता मोकळा करुन दिला जातो. सदरच्या रुग्णवाहिकेला एका ठिकाणाहून तीच्या इच्छीत स्थळी पोहोचेपर्यंत वाहतूक शाखेमार्फत पथदर्शक म्हणून वाहनासह अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. रुग्णवाहिका वाहतूक कोंडीमुळे कोठेही थांबून राहणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जाते. मुंबई पोलीस वाहतूक विभागातर्फे अशा प्रकारची सुविधा सन २०१५ मध्ये ३ वेळा, सन २०१६ मध्ये ३९ वेळा तर माहे नोव्हेंबर, २०१७ अखेरपर्यंत ३३ वेळा रुग्णवाहिकांना पुरविण्यांत आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईच्या वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी अवजड वाहनांवर ठराविक कालावधीत प्रवेश बंदीचा घेतलेला निर्णय

**(४) ९६९११ (२७-१२-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी अवजड वाहनांवर सकाळी ७ ते रात्रौ १२ पर्यंत प्रवेश बंदीचा शासनाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात वाहनांच्या संख्येमध्ये झालेली वाढ आणि विविध मोठे प्रकल्प इ.ची कामे सुरु असल्याने रस्त्यांवरील जागा मोठ्या प्रमाणावर व्यापली जाऊन वाहतूकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे संभाव्य धोका, अडथळा आणि गैरसोय टाळण्यासाठी अवजड वाहनांना मुंबई शहरात काही ठराविक कालावधीकरीता प्रवेश करण्यास दिनांक

१२.०९.२०१७ दिनांक २३.०१.२०१८ व दिनांक १८.०४.२०१८ च्या अधिसूचनेन्वये निर्बंध घालण्यांत आलेले आहेत.

उक्त अधिसूचनेनुसार मुंबई शहरात बाहेरुन येणाऱ्या व जाणाऱ्या अवजड वाहनांना सकाळी ०८.०० ते ११.०० व सायंकाळी १७.०० ते २१.०० पर्यंत प्रवेश करण्यास व सर्व प्रकारच्या रस्त्यांवर धावण्यास निर्बंध असतील. या निर्बंधांमधून प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या खाजगी बसेस, एस.टी. बसेस, बेस्ट बसेस, स्कूल बसेस, खाजगी कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांकरीता असलेल्या बसेस, "मुंबई दर्शन"च्या बसेस, तसेच अत्यावश्यक सेवा पुरविणारी अवजड वाहने व शासकीय / निमशासकीय वाहने वगळण्यांत आली आहेत.

(३) नमूद अधिसूचनेन्वये घालण्यांत आलेल्या निर्बंधांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनाचालकांवर वाहतूक विभागामार्फत कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी-वाडा-मनोर (जि.ठाणे) महामार्गावर वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा झालेला मृत्यू**

**(५) ९८६८० (०६-०१-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-वाडा-मनोर (जि.ठाणे) महामार्गावर दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने या महामार्गाचे काम पूर्ण न केल्यामुळे हा अपघात घडल्याने या कंपनीवरही गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) दिनांक २२ ऑक्टोबर, २०१७ रोजी मनोर-वाडा महामार्गावर सापन (ता.वाडा, जि.पालघर) गांवाचे हद्दीतील वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यु झालेला आहे.

(२) हे खरे नाही. सदरचा मार्ग हा वन विभागाच्या जागेतून जात असल्याने तेथील काम झालेले नाही.

(३) घटनेतील नमूद व्यक्ती ही त्याच्या बुलेट मोटारसायकलवरुन सापने गांवाचे हद्दीतून जात असतांना समोरुन येणाऱ्या अज्ञात वाहनाच्या धडकेने झालेल्या अपघातात ठार झाली. तसेच धडक देणारा वाहनचालक हा जखमीस उपचाराकरीता न नेता व अपघाताची खबर न देता पळून गेला.

या अनुषंगाने वाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१९२/२०१७, भा.दं.वि. कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, मो.वा.का. कलम १८४ व १८७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंध्र बँकेच्या (अमरावती) व्यवस्थापकांनी बनावट दस्ताएवजाच्या आधारे रुपये ९८ लाखांचे कर्ज मंजूर करून बँकेची फसवणूक केल्याचे प्रकरण**

**(६) १०१८३७ (०६-०१-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती परिसरातील इर्विन चौकातील आंध्र बँकेचा तत्कालीन व्यवस्थापक श्री. यादव निखारे यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रिटींग प्रेस स्थापनेसाठी ९८ लाख रूपयांचे कर्ज मंजूर करून बँकेची फसवणूक केली असल्याची माहिती माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची अमरावती पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आले असतांनाही अद्यापही तपास धिम्या गतीने सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

(२), (३) व (४) बँक मॅनेजर, आंध्र बँक शाखा इर्विन चौक, अमरावती यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार पो.स्टे. सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे अप. क्र.३५६/२०१६ कलम ४२०, ४०६, ४०९, ४६५, ४६७, ४७१, १२०(ब), ३४ भादंवि अन्वये बँकेचे तत्कालीन व्यवस्थापक यादव निखारे व इतर ४ आरोपींविरोधात बँकेची फसवणूक करुन कर्ज मंजूर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचा सखोल तपास आर्थिक गुन्हे शाखा, अमरावती यांच्या मार्फत करण्यात आला असून आरोपींविरुध्द सबळ पुरावे उपलब्ध झाल्याने मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरिवली, मुंबई प्रभाग क्र. २५ मधील वसाहतीजवळ रस्त्याच्या दुतर्फा उभ्या राहणा-या वाहनांवर कारवाई करण्याबाबत**

**(७) १०२२२७ (२७-१२-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली, मुंबई प्रभाग क्र. २५ मधील १२० फूट रस्ता स्व.श्री. विलासराव देशमुख चौक, ६० फूट रस्ता ठाकूर सर्कल ते दत्त्तनी पार्क गणपती टॉवर, १३.४० मिटर रस्ता लक्ष्मी नगर, इसीस हॉस्पिटल व ऑक्सफोर्ड शाळेजवळ, जानूपाडा रिक्षा स्टॅड ते सनसिटी वसाहतीजवळ रस्त्याच्या दुतर्फा उभ्या राहणा-या वाहनांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाहतूक विभाग, कांदिवली, महानगरपालिका उपायुक्त-परि.७, कांदिवली, मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार वसाहतीजवळ रस्त्याच्या दुतर्फा उभ्या राहणा-या वाहनांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) लेखी तक्रारीच्या अनुषंगाने नमूद रस्त्यावरील, त्यालगतच्या रस्त्यावरील आणि परिसरात माहे जून, २०१७ ते एप्रिल, २०१८ अखेरपर्यंत कस्तूरबा मार्ग पोलीस ठाणे आणि समतानगर पोलीस ठाणे यांच्या मदतीने वाहतूक पोलीस यांनी संयुक्तरित्या कारवाई करुन रस्त्याच्या दुतर्फा धोकादायकरित्या वाहन पार्किंग करणाऱ्या वाहन चालक/मालकांविरोधात भादंवि कलम २८३ अन्वये स्थानिक पोलीस ठाण्यात एकूण ६३ गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये २९ बस, ४३ ट्रक/डंपर/टेम्पो, ७ ऑटोरिक्षा अशा एकूण ७९ वाहनांचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे दहिसर वाहतूक विभागाअंतर्गत ३३ टेम्पो आणि ११९ ऑटोरिक्षांवर नो पार्किंगची कारवाई करण्यांत आली असून त्यांच्याकडून दंड वसूल करण्यांत आलेला आहे. तसेच इतर प्रकारच्या एकूण ५५७ वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यांत आलेली आहे. अशा प्रकारची कारवाई सातत्याने करण्यांत येत असून वाहतूक सुरळीत ठेवण्याबाबत खबरदारी घेण्यांत येते.

त्याचप्रमाणे महानगरपालिकेमार्फत रस्त्यावरील जुन्या व बेवारसपणे उभ्या असणाऱ्या वाहनांवर महानगरपालिका अधिनियम, ३१४ अन्वये नोटीस बजावून वेळोवेळी कर्षण कारवाई करण्यांत येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मु.पो.कनेरसर, (ता.खेड जि.पुणे) येथील खाजगी सावकारी करणाऱ्या व्यक्तीची तसेच ग्रामपंचायत सदस्य यांची चौकशी करण्याची केलेली मागणी

**(८) १०५०६३ (११-०४-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु.पो.कनेरसर, (ता.खेड जि.पुणे) येथील खाजगी सावकारी करणारे श्री. अरविंद चंदुलाल जाधव यांनी देवस्थानच्या घेतलेल्या ६ जमिनींची चौकशी करावी तसेच खरेदी-विक्री काळात ग्रामपंचायत सदस्य व इतरांचीही चौकशी करावी या मागणीकरीता आझाद मैदान, मुंबई येथे श्री.अशोक टाव्हरे यांनी उपोषणाला बसल्यानंतर या प्रकरणी मा.गृह राज्यमंत्री यांना भेटून

निवेदन दिले असता, मा.गृह राज्यमंत्र्यांनी पोलीस अधीक्षक, पुणे यांना सदर चौकशीचे आदेश दिल्याची बाब दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. अशोक टाव्हरे यांनी कोणत्या देवस्थान ट्रस्टच्या ६ जागा अरविंद चंदुलाल जाधव यांनी बळकाविल्याचा आरोप केला आहे, त्या जागा किती एकर वा किती गुंठे आहेत व त्या कोणत्या देवस्थान ट्रस्टच्या मालकीच्या होत्या, संबंधीत ट्रस्टींनी जागा विकताना धर्मादाय आयुक्तांची आवश्यक ती परवानगी घेतली होती किंवा नाही याबाबतचा तपास पोलीसांनी करताना श्री.अरविंद चंदुलाल जाधव हा बेकायदेशीररित्या सावकारी करीत असल्याबाबतचा तपास पूर्ण केला आहे काय,

(३) असल्यास, श्री. अशोक टाव्हरे यांनी या प्रकरणी विविध पातळ्यांवर लेखी तक्रार करुनही त्यांना न्याय न मिळाल्याने त्यांनी आझाद मैदानात उपोषण सुरु केले होते, त्यावेळेस त्यांनी उपोषणास बसण्याकरीता कोणकोणत्या गैरप्रकाराची चौकशी होण्याची मागणी केली होती, या सर्व बाबींची चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधित आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४)सदर अर्जातील गैरअर्जदार अरविंद चंदुलाल जाधव यांची चौकशी करण्यात आली आहे. या प्रकरणी चौकशी कामी अर्जदार यांना उपस्थित राहण्याबाबत सूचना केली मात्र ते चौकशी कामी उपस्थित रहात नाहीत असे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील गोरेगांव-मालाड लिंकरोडवरील 'नाईट सिटी बार अँड रेस्टॉरंट' या बारमध्ये बालकांचे होत असलेले शारीरिक शोषण

**(९) १०५४५५ (१२-०४-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगांव-मालाड लिंकरोडवरील 'नाईट सिटी बार अँड रेस्टॉरंट' या बारमध्ये गिऱ्हाईकांच्या मनोरंजनाच्या नावाखाली लहान मुली व मुलांचे शारिरीक शोषण मोठ्या प्रमाणात होत असल्याच्या तक्रारी स्थानिक रहिवाश्यांनी पोलीस स्टेशनला अनेक वेळा केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) नाही.

(२), (३) व (४) यासंदर्भात समाजसेवा शाखा व मालाड पोलीस ठाणे यांनी सदर आस्थापनेवर संयुक्तरित्या धाड टाकली असता गिऱ्हाईकांच्या मनोरंजनाच्या नांवाखाली लहान मुली व मुलांचे शारिरीक शोषण होत असल्याचे आढळून आले नाही.

---

## मुंबईतील नागपाडा व मुंबई सेंट्रल येथील मराठा मंदिर येथे मेट्रो रेल्वेसाठी करण्यात येत असलेल्या खोदकामात बॉम्ब सापडल्याबाबत

**(१०) १०५६७५ (०५-०४-२०१८). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नागपाडा येथे मेट्रो रेल्वेसाठी करण्यात येत असलेल्या खोदकामात दोन गावठी बॉम्ब सापडल्याची घटना दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बॉम्ब सापडल्याच्या ठिकाणी १५ वर्षांपूर्वी स्फोट झाला होता, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबईस्थित मुंबई सेंट्रल येथील मराठा मंदिर परिसरात मेट्रोच्या खोदकामामध्ये बॉम्ब सदृश्य वस्तू सापडली असल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबतची माहिती अभिलेखावर उपलब्ध नाही.

(३), (४) व (५) सदरची घटना हि दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन परिसर, मुख्य द्वाराजवळ, डॉ. नायर रोड, नागपाडा, मुंबई येथे मेट्रो रेल्वेसाठी करण्यात येत असलेल्या खोदकामात दोन प्लॅस्टीक बॉम्ब सदृश्य डब्या दिसून आल्या. सदरची घटना दोन ठिकाणी घडली नसून एकाच ठिकाणी घडली आहे. या प्रकरणी चौकशीमध्ये एक प्लॅस्टीक डबी ही विखुरलेली अवस्थेत व दुसरी डबी सुस्थितीत मिळाली. सुस्थितीत मिळालेली डबी बॉम्ब शोधक व नाशक पथकाने निकामी केली आहे. सदरच्या वस्तुंचा पंचनामा करुन अधिक चौकशीसाठी रासायनिक विश्लेषण तंज्ञाकडे पाठविण्यात आल्या आहेत. सदरचा अहवाल प्रलंबित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (ता.जि.ठाणे) शहरालगतच्या सोनाळे औद्योगिक वसाहतीत सोमानी सिंथेटिक्स प्रा.लि या कारखान्यास आग लागल्याबाबत**

**(११) १०५७१६ (०५-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (ता.जि.ठाणे) शहरालगतच्या सोनाळे औद्योगिक वसाहतीत सोमानी सिंथेटिक्स प्रा.लि या अत्याधुनिक यंत्रमाग कारखान्यास भीषण आग लागल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत संपूर्ण कारखान्यातील यंत्रसामुग्री, कच्चा तसेच तयार कपडा जळून खाक झाले असुन या आग प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

सदरची घटना दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी सकाळी ०६.०० चे सुमारास घडली आहे.

(२) व (३) सदर आगीत कारखान्यातील दोन एअरजेट लूम मशीन, दोन सोलर लूम मशीन, अंडरग्राऊंड डक्टीन पाईप, इलेक्ट्रिक वायरींग, स्ट्रक्चर व कच्चा तसेच तयार माल जळून खाक झाला आहे. अग्निशमन दलामार्फत सदरची आग विझवण्यांत आली.

याबाबत सोमानी सिंथेटिक्स प्रा.लि. चे मालक यांनी पोलीसांत खबर दिल्यावरुन दिनांक ०३.०१.२०१८ रोजी अकस्मात जळीत नोंद क्रमांक ०१/२०१८ भिवंडी पो.स्टे. येथे दाखल आहे. सदरची आग ही शॉर्टसर्किटमुळे लागलेली असून याबाबत कोणाविरुध्द तक्रार नसल्याचे कंपनीचे मालक यांनी त्यांच्या निवेदनात नमूद केले आहे. तरी याप्रकरणी चौकशी चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर महानगरपालिकेचे नगरसेवक समद खान, सेवानिवृत्त आर.टी.ओ सह ५ जणांचा खुनाचा रचलेला कट

**(१२) १०६३५७ (१२-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिकेचे नगरसेवक समद खान, सेवानिवृत्त आर.टी.ओ सह ५ जणांचा खुनाचा केलेला कट स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास उधळून टाकल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पोलीसांनी अजहर शेख सह ६ जणांची दरोड्याच्या तयारीतील टोळी पकडून त्यांच्याकडून गावठी कट्यारे ३० जिवंत काडतुसे, वाहने हस्तगत केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत आरोपीविरुध्द गुन्हा नोंदवून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) दि.१३/०१/२०१८ रोजी कोठेतरी दरोडा घालण्यासाठी जात असताना छापा टाकून आरोपींना ताब्यात घेवून अधिक तपास केला असता आरोपींनी सेवानिवृत्त आर.टी.ओ यांच्या खुनाचा कट केल्याचे कबूल केले आहे. आरोपी अहमदनगर महानगरपालिकेचे नगरसेवक यांच्या खुनाच्या कटाबाबत काही एक माहिती सांगत नाहीत.

(२) व (३) सदर प्रकरणी एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून देशी बनावटीचे ५ पिस्टल, ३० जिवंत काडतुसे, दोन रिकाम्या मॅग्झीन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी आरोपींविरूध्द तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं. ३४/२०१८, भा.दं.वि. कलम ३९९, ४०२, सह आर्म ॲक्ट ३, ७/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी दि.२५.०५.२०१८ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले असून सध्या गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील सावखेड तेजन फाटा ते पिंपळगाव खुटा मार्गावर दोन किलो सोने २० लाख रूपयांत देतो असे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत

**(१३) १०६४११ (१२-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील सावखेड तेजन फाटा ते पिंपळगाव खुटा मार्गावर सरकारी जंगलामध्ये दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दोन किलो सोने रुपये

२० लाखांत देतो असे आमिष दाखवून फसवणूक केल्याप्रकरणी चार आरोपींना दिनांक ५ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास सिंदखेडराजा पोलीसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेकडून किती मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे,

(३) असल्यास, त्यांचेवर कोणता गुन्हा दाखल केला आहे व तद्नुसार त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २८/११/२०१७ रोजी २ आरोपींना व दिनांक २९/११/२०१७ रोजी २ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) ८ लाख रुपये पंचनामा करुन हस्तगत करण्यात आले आहे.

(३) दिनांक २८/११/२०१७ रोजी फिर्यादी श्री.निवृत्ती उर्फ बंडू प्रल्हाद शेळके, रा. कोळेगांव यांना (४) आरोपींनी २० लाखात दोन किलो सोने देतो म्हणून ८ लाख रुपये ॲडव्हांस घेवून फिर्यादीची फसवणूक केली आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन सिंदखेड राजा येथे दिनांक २९/११/२०१७ रोजी अप. क्र.२२२/२०१७ कलम ४२०, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात सबळ पूरावे मिळून आल्याने आरोपींविरुध्द विशेष न्यायालयात दिनांक ४/०४/२०१८ रोजी आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली-जालना महामार्गावर महिंद्रा पीकअपने झालेला भीषण अपघात**

**(१४) १०६४६८ (१४-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली-जालना महामार्गावर महिंद्रा पीकअपने दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात सोनू शिंगणे या युवकांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघात प्रकरणी किती जणांना अटक केली व त्यांचेवर कोणती कारवाई केली तसेच अपघातग्रस्तांना कोणती तातडीची मदत दिली वा देण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) सदर अपघाताची घटना दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी १८.३० चे सुमारास घडली आहे. घटनेतील मोटारसायकलस्वार जखमीचा उपचारादरम्यान दिनांक ८.१२.२०१७ रोजी औरंगाबाद येथील रुग्णालयात उपचार सुरु असतांना मृत्यु झाला.

(२) गुन्ह्यातील बोलेरे गाडीचालक आरोपी याचेविरुध्द देऊळगांव राजा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३७६/२०१७, भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८, ३०४(अ) सह मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे दिनांक २९.११.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यांत आला आहे. आरोपीस दिनांक २.१२.२०१७ रोजी कलम ४१(१) अ सीआरपीसी प्रमाणे समजपत्रावर सोडण्यांत आले. मयताच्या नातेवाईकास कोणतीही तातडीची मदत देण्यांत आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) मतदार संघात अवैधरित्या दारू विक्री होत असल्याबाबत**

**(१५) १०६७६९ (११-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) मतदार संघात अवैधरित्या दारूचे माफिये दारू विक्री करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अवैधरित्या दारू विक्री करणा-यांवर अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) सिंदखेडराजा मतदार संघातील हद्दीत अवैध दारु विक्री होणार नाही यादृष्टीने गोपनीय माहितीच्या अधारे सन २०१७ मध्ये दारुबंदी या सदराखाली ७२२ गुन्हे दाखल झाले आहेत त्यामध्ये ७५८ आरोपींना अटक करुन रु.७०,१९,१०८/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गुन्ह्यातील आरोपींविरुध्द म.पो.का. कलम ९३ खाली १९० आरोपींविरुध्द, म.पो.का. कलम ५५-५७ खाली २५ आरोपींविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. तसेच जानेवारी २०१८ ते मे २०१८ पर्यंत दारुबंदी सदराखाली ३१६
गुन्हे दाखल झाले असून त्यामध्ये ३२५ आरोपींना अटक करुन रु.७,६६,७७०/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गुन्ह्यातील आरोपींविरुध्द म.पो.का. कलम ९३ खाली ५५ आरोपींविरुध्द, म.पो.का. कलम ५५-५७ खाली १० आरोपींविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखरखेर्डा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील विविध ठिकाणाहून तीन महिला बेपत्ता झाल्याबाबत**

**(१६) १०६९१८ (११-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरखेर्डा, (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील विविध ठिकाणाहून तीन महिला बेपत्ता झाल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर महिलांचा शोध घेण्याबाबत तसेच संबंधित आरोपींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत दिनांक २७.१२.२०१७ रोजी दोन महिला रानअत्री येथून बेपत्ता झाल्याची तक्रार प्राप्त झाली होती. सदर दोनही महिला शोध घेतल्यानंतर दिनांक ८/०१/२०१८ रोजी मिळून आल्या.

दिनांक ०१/०१/२०१८ रोजी एक महिला मलकापूर पांग्रा येथून बेपत्ता झाल्याची तक्रार प्राप्त झाली होती. सदर महिला शोध घेतल्यानंतर दिनांक २६/०४/२०१८ रोजी मिळून आली.

तसेच दिनांक ४/०१/२०१८ रोजी शेळू येथून एक महिला बेपत्ता झाल्याची तक्रार प्राप्त झाली होती. सदर महिला शोध घेतल्यानंतर दिनांक १२/०४/२०१८ रोजी मिळून आली

वरील सर्व महिलांनी त्या स्वमर्जीने निघून गेल्या असल्याचे सांगून त्यांनी कोणाविरुध्दही पो. स्टे. मध्ये तक्रार दिली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरा लगतच्या ग्रामीण भागामध्ये एटीएम चा दुरुपयोग करणारी टोळी सक्रिय असल्याबाबत

**(१७) १०६९२६ (१८-०४-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर ग्रामिण जिल्हा अंतर्गत काटोल, कळमेश्वर, सावनेर, पारशिवनी, रामटेक, खापरखेडा, केडवद या भागामध्ये एटीएम चा दुरुपयोग करणारी टोळी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एटीएम कार्ड चे हात चालाकीने बदल करुन कार्ड धारकांच्या खात्यातुन लाखो रुपयांची उचल होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर शहर व ग्रामीण भागातील एटीएम वर अपु-या प्रमाणात सुरक्षा असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) नागपूर ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रात सदर प्रकरणी एटीएमचा दुरुपयोग करणाऱ्या टोळीविरुध्द ९ गुन्हे दाखल आहेत. नागपूर शहर यांच्या कार्यक्षेत्रामध्ये जानेवारी २०१८ मध्ये एटीएम धारकांकडून त्यांचे एटीएम क्रमांक भुलथाप करुन प्राप्त करुन (लबाडीने) त्यांचे खात्यातून एकूण ५०,१९३/- रु. काढून घेतले बाबत ३ गुन्हे दाखल आहेत.

नागपूर शहर व ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनचे हद्दीत वित्तीय संस्था / बँक/एटीएम भागात सुरक्षा रक्षक नेमणे, सिसिटिव्ही कॅमेरे लावणे, अलार्म सिस्टम अद्ययावत ठेवणेबाबत बँक संचालक यांना पोलीस स्टेशन मार्फत पत्रव्यवहार करण्यात आलेले आहेत. तसेच पोलीसांची नियमीत पेट्रोलींग चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गृहरक्षक दलाच्या (होमगार्ड) माजी सदस्यांना शासनाने मानधन देण्याच्या मागणीबाबत

**(१८) १०७९१७ (०७-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गृहरक्षक दलाच्या (होमगार्ड) माजी सदस्यांना शासनाने मानधन द्यावे, अशी मागणी नेवासा शहरातील (जि.अहमदनगर) माजी होमगार्ड वरघुडे व होमगार्ड समादेशक देवखिळे यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तहसिलदारांना व मा. मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरूप काय आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) गृहरक्षक दलाच्या (होमगार्ड) माजी सदस्यांना मानधन देण्याबाबतची मागणी रास्त नाही, कारण होमगार्डचे कर्तव्य हे काम नसून सेवा आहे. त्याचप्रमाणे मुंबई होमगार्ड अधिनियमात माजी सदस्यांना मानधन देण्याबाबत तरतूद नसल्याने या मागण्या शासनास मान्य करता येणार नाहीत, असा शासनाने यापूर्वी निर्णय घेतला असून तो सर्व संबधितांना कळविण्यात आला आहे.

---

### अहमदनगर जिल्हयातील शनिशिंगणापूर व सोनई परिसरात अवैध धंद्याचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१९) १०७९२३ (११-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील शनिशिंगणापूर व सोनई परिसरात राजरोसपणे मटका, जुगार व दारू हे अवैध धंदे वाढले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अवैध धंद्याना प्रतिबंधीत करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१), (२) व (३) शनिशिंगणापूर पोलिस ठाणे हद्दीत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये मटका, जुगार या अवैध धंद्यांवर छापा टाकून १ केस दाखल करून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. तसेच अवैध दारू संदर्भात छापा टाकून १ केस दाखल करून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. तर माहे डिसेंबर, २०१७ मध्ये शनिशिंगणापूर पोलिस ठाणे हद्दीत मटका, जुगार व अवैध दारू धंद्यांबाबत गुन्हा दाखल नाही. सोनई पोलिस ठाणे हद्दीत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये मटका, जुगार या अवैध धंद्यांवर छापे टाकून २२ केसेस दाखल करून २२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच अवैध दारू संदर्भात छापे टाकून ७ केसेस दाखल करून ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर माहे डिसेंबर, २०१७ मध्ये मटका, जुगार या अवैध धंद्यांवर छापे टाकून ३ केसेस दाखल करून ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच अवैध दारू संदर्भात छापे टाकून ४ केसेस दाखल करून ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

चोरून लपून चालणाऱ्या अवैध धंद्यांचे गुप्त बातमीदारांमार्फत माहिती प्राप्त करुन समुळ उच्चाटन करण्यात आलेले आहे. वेळोवेळी केम्बिंग ऑपरेशन करून अवैध धंद्यांची माहिती काढून कार्यवाही करण्यात येते.

अवैध धंदे करणाऱ्यांविरूध्द सन २०१६ मध्ये शनिशिंगणापूर पोलिस ठाणेंतर्गत मुंबई दारूबंदी अधिनियम च्या कलम ९३ प्रमाणे ३ इसमांविरूध्द कारवाई केलेली आहे. तसेच सन २०१७ मध्ये शनिशिंगणापूर पोलिस ठाणेंतर्गत मुंबई पोलिस अधिनियम च्या कलम ५५, ५६ प्रमाणे २ इसमांविरूध्द कारवाई केलेली आहे. सन २०१६ मध्ये सोनई पोलिस ठाणेंतर्गत मुंबई दारूबंदी अधिनियम च्या कलम ९३ प्रमाणे अवैध दारू विक्रि करणाऱ्या ८ इसमांविरूध्द कारवाई केलेली आहे. तसेच सन २०१७ मध्ये अवैध दारू विक्रि करणाऱ्या १५ इसमांविरूध्द मुंबई दारूबंदी अधिनियम च्या कलम ९३ प्रमाणे कारवाई केलेली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## पुणे शहरात साखळी व मोबाईल चोरींचे वाढते प्रमाण

**(२०) १०९०२९ (१२-०४-२०१८). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात वाढत्या चैन स्नॅचिंगच्या व मोबाईल स्नॅचिंग बाबत महिलावर्ग रस्त्यावर जात असतेवेळी पाठीमागून दुचाकी वरून येऊन गळ्यातील सुवर्ण अलंकार आणि महागडे मोबाईल फोन पळविण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पवयीन मुले गुन्हेगारीकडे वळून दुचाकीवरून महिला वर्गाच्या गळ्यातील सुवर्ण अलंकार, महागडे मोबाईल व हातातील पर्स घेऊन पसार होतात, याबाबत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये अनेक गुन्हे दाखल आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रात मोबाईल व चैन स्नॅचिंग गुन्ह्याबाबत सन २०१६ व २०१७ मधील तुलनात्मक विवरणपत्र खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| वर्ष | चैन स्नॅचिंग | | मोबाईल स्नॅचिंग | |
|---|---|---|---|---|
| | घडलेले गुन्हे | उघडकीस आलेले गुन्हे | घडलेले गुन्हे | उघडकीस आलेले गुन्हे |
| २०१६ | १४१ | १३० | २१ | ७ |
| २०१७ | ९७ | ८७ | ५२ | ३५ |

वरील विवरणपत्रावरुन चैन स्नॅचिंगच्या गुन्ह्यात घट झाली आहे परंतू मोबाईल स्नॅचिंगच्या गुन्ह्यात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

(२) अल्पवयीन मुलांनी दुचाकीवरुन महिला वर्गाच्या गळ्यातील सुवर्ण अलंकार, हातातील पर्स हिसकावून नेले संबंधात गुन्हे दाखल नाहीत.

परंतू मोबाईल स्नॅचिंग संदर्भात सन २०१७ मध्ये २ अल्पवयीन मुलांकडून ४ गुन्हे झाल्याचे उघडकीस आले आहे.

(३) सोनसाखळी चोरट्यांच्या टोळीस आळा घालण्याकरीता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेली आहे.

१) प्रादेशिक स्तरावर संबंधित अपर पोलीस आयुक्त हे त्यांचे प्रादेशिक विभागात दररोज एक कोबींग ऑपरेशन आयोजित करतात.

२) पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी हे त्यांचे हद्दीतील अशा प्रकारचे गुन्हे घडलेल्या भागात Z टाईप बॅरीकेड्स लावून नाकाबंदी केली करतात.

३) संशयीत मोटारसायकलस्वार यांची खात्री करणे.

४) पोलीसांचे अस्तित्व गुन्हेगारांचे निदर्शनास येईल याकरीता, विरळ भागात सरकारी गणवेशातील पुरुष व महिला कर्मचारी यांची नेमणूक करुन गस्त वाढविणे.

५) गर्दीच्या ठिकाणी पोलीसांची गस्त वाढविणे.

६) अटक आरोपींची माहिती संबंधीत जिल्ह्यातील पोलीस स्टेशनला देणे.

७) निवासी गृहसंकूलामध्ये नागरिकांच्या बैठका घेऊन चैन स्नॅचिंगच्या गुन्ह्यांबाबत जागरुक करुन त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ते मार्गदर्शन करणे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील महाराजबाग खाजगी ट्रॅव्हल्सच्या बसेसमुळे होत असलेली वाहन कोंडी

**(२१) १०९५९१ (१२-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील महाराजबाग मार्गावर खाजगी ट्रॅव्हल्समुळे वाहतुकीची कोंडी होत असून याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीनंतर वाहतुक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान महाराजबाग मार्गावर ट्रॅव्हल्समुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याबाबत लेखी तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) उपरोक्तप्रमाणे लेखी तक्रार प्राप्त नाही. परंतु महाराजबाग मार्गावरील भोले पेट्रोलपंप येथील म्हाडा संकुलासमोर व पेट्रोलपंपाचे बाजूला उभ्या असलेल्या खाजगी ट्रॅव्हल्स बसेसमुळे त्या ठिकाणी वाहतूकीची कोंडी निर्माण होताच त्या बसेसवर वाहतूक विभागाकडून मोटार वाहन कायदा, १९८८ कलम १२२ अन्वये केसेस करण्यांत येतात. सन २०१७ मध्ये अशा १३० केसेस करण्यांत आल्या आहेत.

त्याचप्रमाणे नागपूर शहरात ट्रॅव्हल्स बसेसमुळे होणाऱ्या वाहतूक समस्या व वाहतूक कोंडीसंदर्भात मा.लोकप्रतिनिधी तसेच जनतेकडून प्राप्त तक्रारी व निवेदनांच्या अनुषंगाने नागपूर शहरातील खाजगी ट्रॅव्हल्स बसेसचे थांबे शहराबाहेर स्थलांतरीत करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, नागपूर यांना शहर वाहतूक विभागामार्फत प्रस्तावित करण्यांत आले आहे.
(३) वाहतूक कोंडीबाबत तक्रार प्राप्त होताच शहर वाहतूक विभागामार्फत त्या ठिकाणी कारवाई करुन वाहतूकीची कोंडी दूर करण्यांत येते.

---

## अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) थेरोंडा बाजारपाडा येथे अतिक्रमण करण्यात आल्याबाबत

**(२२) १०९८६५ (१२-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग तालुक्यातील (जि. रायगड) थेरोंडा बाजारपाडा या ठिकाणी बेकायदेशीरित्या करण्यात आलेल्या अतिक्रमणावर कारवाई करण्यास गेलेल्या महसूल कर्मचा-यांवर दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास हल्ला करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार आतापर्यंत किती जणांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मंडळ अधिकारी चैल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रेवदंडा पोलीस स्टेशनमध्ये कॉ.गु. र. नं.१३३/२०१७ भादंवि क., सह कलम ३५३, ३५२, १४३, १४७, १४९, ५०४, ५०६ सह मो.वा.का. कायदा कलम १८४ अन्वये ७ आरोपींविरुध्द गुंन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपितांवर अलिबाग कोर्टात दोषारोपपत्र दाखल आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यात वाढत्या चोरींच्या घटनांबाबत

**(२३) ११०५९९ (१२-०४-२०१८). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग, कर्जत, महाड तालुक्यात (जि.रायगड) दिनांक २५ डिसेंबर, २०१७ ते २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यादरम्यान सतत ४ दिवस चोरीच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोख रक्कम व सोन्याचे दागिने असे एकुण ९ लाख ८६ हजार रूपयांच्या ऐवजाची दिनांक २७ व २८ डिसेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास या दोन दिवसात चोरी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यात दिवसेंदिवस चोरीच्या प्रकारामध्ये होत असलेली वाढ पाहाता शासनाकडून यावर कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

अलिबाग, कर्जत, महाड तालुक्यात (जि.रायगड) दिनांक २५ डिसेंबर, २०१७ ते २८ डिसेंबर, २०१७ या कालावधीत एकूण ६ चोरीच्या घटना घडल्या आहेत.

(२) रायगड जिल्ह्यातील अलिबाग, कर्जत व महाड या तालुक्यात दिनांक २७ व २८ डिसेंबर, २०१७ या दोन दिवसात मालमत्तेच्या संदर्भात एकूण ४ गुन्हे घडले असून सदर गुन्हयात एकूण ३,२९,५००/- रूपये त्यात रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा ऐवज चोरीस गेला आहे.
(३) रायगड जिल्ह्यातील चोरींच्या घटनास आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आली आहे.

रात्रीच्या वेळी जास्तीत जास्त नाकाबंदी लावून ईसमांना चेक केले जाते, पोलीस ठाणे हद्दीत रात्रीच्या वेळी जास्त पोलीस बंदोबस्त लावला जात आहे, रायगड जिल्ह्यात बिट मार्शल जोडी ही २४ तास शहराच्या हद्दीत गस्ती करीता नेमले आहेत, चैन स्नॅचिंग सारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी दामिनी पथक नेमण्यात आले आहे, रेकॉर्डवरील आरोपींना चेक करण्यात येत आहे, जेलमधून सुटणाऱ्या आरोपीत यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे, तसेच शहरांमधील सोसायटींना सुरक्षारक्षक नेमणेबाबत व सीसीटीव्ही कॅमेरे लावणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणार बाजार समितीकडून (जि.बुलढाणा) परवाना घेत अडत व्यवसायाच्या शेतकरी व बाजार समितीची फसवणूक केल्याबाबत**

**(२४) ११२९०२ (१२-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार बाजार समितीकडून (जि. बुलढाणा) परवाना घेत अडत व्यवसायाच्या शेतकरी व बाजार समितीची फसवणूक केल्या प्रकरणी बाजार समिती सचिव श्री. रामदास वायाळ यांनी हिंगोली जिल्ह्यातील श्री. योगेश रामेश्वर शर्मा यांच्या विरोधात माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान लोणार पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सचिव, लोणार बाजार समिती यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार योगेश शर्मा या अडत्याने ४० ते ५० शेतकऱ्यांना जास्त दराचे अमिष दाखवून सोयाबीन, तूर, हरबरा ज्यादा दराने घेवून त्यांना चेक पावत्या देवून जानेवारी २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत रु.२४,७०,२९७/- रुपयांची फसवणूक केली म्हणून पोलीस स्टेशन लोणार येथे अप. क्र.२६/२०१८, कलम ४२० भादंवि प्रमाणे दिनांक २१ जानेवारी २०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपी योगश शर्मा यांस दिनांक ३१ जानेवारी २०१८ रोजी अटक करण्यात आली. आरोपीविरुध्द दिनांक ३ एप्रिल २०१८ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील वाडीव-हे परिसरातील मुरंबे, मुकणे, गोंदेदुमाला, बेलगाव कु-हे, कु-हेगाव येथील शेतक-यांच्या जनावरांची चोरी होत असल्याबाबत**

**(२५) ११३१४७ (१२-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील वाडीव-हे परिसरातील मुरंबे, मुकणे, गोंदेदुमाला, बेलगाव कु-हे, कु-हेगाव येथील शेतक-यांच्या सुमारे शंभर ते सव्वाशे दुभत्या जनावरांसह शेतीला उपयुक्त असणा-या जनावरांची प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे चोरी झाली असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चोरटे स्थानिकांच्या मदतीने जनावरे चोरुन थेट कत्तलखान्यात पाठवित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे प्रशासाने त्वरीत लक्ष घालून या चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशा मागणीचे निवेदन ४१ शेतक-यांनी येथील पोलीस उपायुक्त यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निवेदनाची दखल घेऊन शासनाने या चोरट्यांचा तपास करण्याबाबत तसेच येथील निष्क्रीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) व (२) वाडीव-हे गावातून दि.१०.१२.१७ रोजी २ जनावरे चोरी झालेबाबत वाडीव-हे पोलिस ठाणे येथे गु.र.नं.२४८/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. तर गडगड सांगवी ता.इगतपूरी येथून दि.२५.११.१७ रोजी २ जनावरे चोरी झालेबाबत वाडीव-हे पोलिस ठाणे येथे गु.र.नं.२६५/२०१७ भा.द.वि.कलम ३७९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. चोरी झालेली जनावरे थेट कत्तलखान्यात पाठविण्यात आल्याचे निष्पन्न झालेले नाही.

दि.२७.०१.२०१८ रोजी घोटी ते सिन्नर रोडवर पिंपळगाव डुकरा शिवारात महिंद्रा पिक अप गाडीतून ८ लहान मोठी जनावरे नेताना मिळून आल्याने आरोपी वाहनचालकास अटक करण्यात आली असून याप्रकरणी वाडीव-हे पोलिस ठाणे येथे गु.र.नं.१०/२०१८ म.प्रा.सं.का.कलम ५६/११, भा.प्र.नि.वा.प्र.कलम ११(१) (ड) क फ (२) व मो.वा.का.क.८३/१७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे.

(३) उपविभागीय पोलिस अधिकारी यांचे कार्यालयात निवेदन प्राप्त झाले आहे.
(४) घडलेल्या घटनांची दखल घेवून ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या गुन्ह्यात आरोपींना अटक करण्यात आली असून २ गुन्हे पोलिस तपासावर प्रलंबित आहेत. गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी पोलिस ठाणे हद्दीत वेळोवेळी मोटार सायकल पेट्रोलिंग, नाकाबंदी नेमण्यात येत असते. सदर घटनांमध्ये पोलिस अधिकारी /कर्मचारी यांची चुक दिसून येत नसल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.
(५) विलंब झालेला नाही.

---

**अकोला (जि.अकोला) येथील नगर सेविका यांनी क्षेत्रीय अधिका-यांविरुध्द पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीबाबत**

**(२६) ११३२०३ (०७-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) येथील नगर सेविका यांनी क्षेत्रीय अधिका-यांच्या मनमानी कारभाराविरुध्द खदान (जि.अकोला) पोलीस ठाण्यात माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्षेत्रीय अधिका-याविरुध्द पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
प्रभाग क्र.१९ मधील साफसफाई व जेसीबी पाठविण्याच्या करणामुळे तसेच प्रभागातील अतिक्रमण हटविण्याच्या कारणामुळे अकोला महानगर पालिकेतील नगरसेविकेने क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना केल्याने क्षेत्रिय अधिकारी यांनी उद्धट भाषेत व अपमान जनक भाषेत संभाषण करुन ॲट्रासिटी खाली गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली अशा आशयाचा अदखलपात्र गुन्हा दिनांक १७ जानेवारी २०१८ रोजी गुन्हा क्र.६२/२०१८ कलम ५०६ भादंवि प्रमाणे पोलीस स्टेशन खदान येथे नोंदविण्यात आला आहे.
(२) अदखलपात्र स्वरुपाची तक्रार असल्याने अर्जदारास न्यायालयात दाद मागण्याबद्दल कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदवड तालुक्यातील (जि.नाशिक) मध्य रेल्वेच्या मार्गावर असलेल्या समीट रेल्वे स्टेशन जवळ स्फोटक सदृश्य पदार्थ खाल्याने चार कुत्र्यांचा झालेला मृत्यु**

**(२७) ११४४०८ (१२-०४-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड तालुक्यातील (जि.नाशिक) मध्य रेल्वेच्या मार्गावर असलेल्या समीट रेल्वे स्टेशन जवळ कांद्याच्या आकाराचे स्फोटक सदृश्य पदार्थ खाल्याने चार कुत्रे ठार झाल्याची घटना दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेची शासनाने सखोल चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

दि.०१/०२/२०१८ रोजी कोणीतरी अज्ञात इसमाने समिट रेल्वे स्टेशन परीसरात भारतीय स्फोटक पदार्थ अधिनियम १९०८ चे कलम २ या संज्ञेतील मोदकाचे आकारातील स्फोटके हयगयीने व निष्काळजीपणाने टाकुन दिली. त्यानंतर सदरची स्फोटके पाळीव व भटकी कुत्रे खात असतांना सदर स्फोटकांचा स्फोट होवुन एकुण तीन कुत्रे मृत व एक कुत्रे जबर जखमी झाले. तसेच मोदकाचे आकारातील २ स्फोटके स्फोट होण्याआधी ताब्यात घेतले आहेत. या घटनेबाबत चांदवड पो. स्टे. येथे गुरनं.१९/१८ भादवि. २८६,४२९ सह भारतीय स्फोटक पदार्थ अधि.१९०८ चे कलम ४ (अ), (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार-नालासोपारा येथे घरफोडी, चोऱ्या, दरोडे व खून इ. गुन्ह्यात लक्षणीय वाढ झाल्याबाबत

**(२८) ११४६७० (११-०४-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार-नालासोपारा येथे सन २०१७-१८ या कालावधीत घरफोडी, चोऱ्या, दरोडे व खून इ. गुन्ह्यात लक्षणीय वाढ झाल्याने नागरीकांमध्ये विशेषता महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून याबाबत वेळोवेळी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी संबंधित अधिकारी व शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनस्तरावरून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार-नालासोपारा विभागात शहरीकरण झाल्याने तेथे मोठ्या प्रमाणात लोकसंख्येत वाढ झाली आहे. तसेच, मोठ्या प्रमाणावर दाट लोकवस्ती आहे त्यामुळे तेथे गुन्ह्याचे प्रमाणात वाढ होत आहे. पालघर जिल्ह्यातील वसई-विरार-नालासोपारा परिसरातील पोलीस ठाण्यांचे अभिलेखावर सन २०१७ ते मार्च, २०१८ पावेतो घरफोडी व चोरीचे गुन्हे पाहता एकूण १४९६ गुन्हे दाखल असुन त्यापैकी ३७८ गुन्हे उघडकीस आणुन ६०५ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच, दरोडे या

सदराखाली एकूण ६ गुन्हे दाखल असुन सर्व गुन्हे उघडकीस आणून १७ आरोपींवर कारवाई केली आहे. त्याचबरोबर, खुन या सदराखाली एकूण ४८ गुन्हे दाखल असुन त्यापैकी ४५ गुन्हे उघडकीस आणून त्यात एकूण १२० आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच, वसई-विरार-नालासोपारा परिसरातील नागरिकांनी घरफोडी, चोऱ्या, दरोडे व खून याबाबत तक्रारी दाखल केल्या असता संबंधित तक्रारीबाबत तातडीने दखल घेण्यात येते.

(२) सदर प्रकरणी नागरिकांच्या प्राप्त होणा-या तक्रारी, अर्जावर संबंधित पोलीस ठाण्याकडुन तपास, चौकशी वा उचित कार्यवाही करण्यात येते. तसेच, गुन्हे घडु नये याकरिता पोलीस ठाण्याकडून कार्यक्षेत्रात दैनंदिन बीट मार्शल, पेट्रोलिंग, नाकाबंदी, कोम्बींग ऑपरेशन केले जाते.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी वसई-विरार-नालासोपारा परिसरात दामिनी पथक नेमण्यात आलेले असुन त्यामध्ये १ महिला पोलीस अधिकारी व ४ महिला कर्मचारी व १ वाहन देण्यात आले आहे. तसेच, जाणीव ट्रस्टच्या माध्यमातुन प्रत्येक शाळेत महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थितीत मिटींगचे आयोजन करुन मुलींमध्ये जनजागृती तसेच त्यांच्या समस्या/तक्रारी जाणुन घेण्यात येतात. माहे जुन २०१७ ते मार्च २०१८ पर्यंत वसई तालुक्यातील शाळा/ महाविद्यालयात ६१ व्याख्याने घेण्यात आलेली आहेत. व्याख्यानानंतर प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने त्वरीत कारवाई करण्यात येते. महिला तक्रार निवारण व तात्काळ मदतीकरिता जिल्हा पोलीस मुख्यालय पालघर येथे स्मार्ट फोन क्र. ९७३०८११११९, ९७३०७११११९ कार्यान्वित करुन सदर क्रमांकाची प्रसिध्दी करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव शहरामधील वाढलेल्या चो-या, दरोडे व घरफोड्याबाबत**

**(२९) ११४९४८ (१२-०४-२०१८). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरामध्ये चो-या, दरोडे, घरफोड्या होत असल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधीनी पुराव्यानिशी जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या निदर्शनास तोंडी तक्रारीद्वारे व निवेदनाद्वारे आणून दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तोंडी तक्रार व निवेदनावर जिल्हा पोलीस प्रशासनामार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुराव्यानिशी तक्रार दिलेल्यावरसुद्धा अद्यापही कार्यवाही न करणारे अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई तसेच जळगाव शहरामध्ये चो-या, दरोडे, घरफोड्यांना प्रतिबंध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) जळगाव शहर व परिसरातील पोलिस अधिकारी यांना गुन्हे बैठका घेवून अभिलेखावरील गुन्हेगारांवर वेळीच प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या सुचना देण्यात आल्या

आहेत. गुन्हेगार दत्तक योजना अंमलात आणून गुन्हे नियंत्रणात ठेवण्याची कारवाई केलेली आहे.

जळगाव शहरातील सन २०१७ व सन २०१८ मधील चोऱ्यांबाबतची माहीती :-

| सन | प्रकार | दाखल | उघड | गेला माल | मिळाला माल |
|---|---|---|---|---|---|
| २०१७ | दरोडा | ९ | ८ | ७८०२०० | ५१८०० |
| | TECH | ७ | ७ | १६९२०० | ५१८०० |
| | PROF | २ | १ | ६११००० | ० |
| | घरफोडी | ७७ | २७ | १३५६६४५२ | ४६७५७७ |
| | चोरी | ३५९ | १७६ | १३७१८४०५ | ४६७७१६० |
| २०१८ माहे मे अखेर | दरोडा | २ | २ | ८८७००० | ५५७००० |
| | TECH | ० | ० | ० | ० |
| | PROF | २ | २ | ८८७००० | ५५७००० |
| | घरफोडी | ३७ | ८ | २५३३७३० | १२६२८२ |
| | चोरी | १२५ | ४० | ७१६७४९४ | ८९९८८१ |

जळगाव शहरामध्ये गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी वेळोवेळी नाकाबंदी करून संशयित वाहने व इसम यांची चौकशी करण्यात येत आहे. कोम्बींग ऑपरेशन व ऑल आउट ऑपरेशन राबवून गुन्हेगारांची तपासणी केली जाते. पोलीस स्टेशन हद्दीत सातत्याने पेट्रोलिंग होण्यासाठी बिट मार्शल मो.सा. पेट्रोलिंग नेमण्यात येत आहे.

गुन्हेगार दत्तक योजना राबवून आरोपीतांचे हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत आहे. शहरात रात्रगस्त सक्तिने होण्याचे अनुषंगाने R.F.I.D. प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. बाजारपेठा, शाळा, कॉलेज, कोचिंग क्लासेस भागात पायी पेट्रोलिंग नेमण्यात येत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींचे माध्यमातून माहिती व सुचना प्राप्त होताच आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत पोलिस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील महामार्गावरील अपघाताचे प्रमाण रोखण्यासाठी वाहन चालकाने नियमांचे पालन करण्याबाबत**

**(३०) ११५४३५ (११-०४-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असुन हे प्रमाण वाहन चालक दारू पिऊन वाहन चालविणे, नियमांचे पालन न करणे, शिस्त न पाळणे, इत्यादी कारणामुळे महामार्गावर दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गावरील अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने वाहन चालकास नियमांचे पालन करवून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) गत तीन वर्षातील अपघाताची पुढील सांख्यिकी पाहता अपघातांचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते.

| सन | एकूण अपघात | जिवघेणे अपघात | मयत संख्या | गंभीर जखमी |
|---|---|---|---|---|
| २०१५ | ६३,८०५ | १२,००९ | १३,१५१ | २२,४२७ |
| २०१६ | ३९,८७८ | ११,७८० | १२,९३५ | २२,२७३ |
| २०१७ | ३५,८५३ | ११,२२० | १२,२६४ | २०,४६५ |
| मे, २०१८ पर्यंत | १५,९३० | ५,२७९ | ५,८२४ | ९,१९४ |

(२) महामार्ग पोलीस विभागाकडून तसेच स्थानिक जिल्हा वाहतूक शाखेमार्फत महामार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी होण्यासाठी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यांत येते. तसेच वाहतुकीचे नियमन करण्यांत येऊन अपघातग्रस्तांना महामार्ग पोलीसांकडून तात्काळ मदत करण्यांत येते.

महामार्ग पोलीस तसेच स्थानिक जिल्हा वाहतूक शाखा यांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर सन २०१५ ते माहे मे, २०१८ पर्यंत केलेल्या कारवाईचा सांख्यिकी तक्ता पुढीलप्रमाणे आहे :-

| सन | एकूण केसेस | एकूण दंड वसूल (रु.कोटी) |
|---|---|---|
| २०१५ | ८०,२०,१९३ | ८९.१० |
| २०१६ | ७५,७२,३७२ | ११३.०० |
| २०१७ | ९३,२५,४९९ | १७४.५० |
| मे, २०१८ पर्यंत | ३६,१५,६६९ | ६२.८० |

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### तिवसा (जि. अमरावती) येथील पोलीस निवासस्थानांची दूरवस्था झाली असल्याबाबत

**(३१) ११५९८९ (११-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती-नागपूर महामार्गावरील तिवसा (जि.अमरावती) शहर हे महत्वाचे केंद्र असुन येथिल पोलीस ठाण्याच्या ब्रिटीशकालीन इमारतीला शंभर वर्ष पूर्ण होत असुनही तेथील पोलीसाच्या निवासस्थानांची दूरवस्था झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस कर्मचा-यांच्या वसाहतीत २१ ब्रिटीशकालीन क्वॉर्टर्स आहे तसेच अनेक क्वॉर्टसच्या खोल्या लहान असल्याने काही कर्मचा-यांनी व-हांडयातच संसार थाटले असुन त्यातच पाण्याचा प्रश्न बिकट असल्याने अनेक पोलीस कर्मचारी भाड्याच्या घरात वास्तव्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीस ठाणे व निवासस्थानांची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) नाही. पोलीस ठाणे, तिवसा तालुका-तिवसा, जिल्हा अमरावती यांची प्रशासकीय इमारत चांगल्या स्थितीत आहे. तसेच, तेथे पोलीस अधिकारीकरिता एक व पोलीस कर्मचाऱ्यांकरिता १७ निवासस्थाने असून निवासस्थानांची सद्य:स्थिती चांगली आहे.

(२) व (३) पोलीस ठाणे तिवसा येथे मंजूर अधिकारी व कर्मचारी यांची संख्या विचारात घेता उक्त सेवा निवासस्थानांची संख्या कमी आहे. म्हणून तेथे अधिक सेवा निवासस्थाने यांचे बांधकाम करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हा न्यायालयाच्या इमारतीमध्ये नवीन अग्निशमन यंत्रे बसविण्याबाबत**

**(३२) ११६९९१ (२६-०७-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा न्यायालयाच्या इमारतीमध्ये न्यायाधीश, वकील, पक्षकार, न्यायालयीन कर्मचारी, पोलीस यांच्यासह हजारो नागरीकांचा वावर असुन इमारतीमधील बहुतांश अग्नीशमन यंत्रे कालबाह्य झाली आहे तसेच त्याबाबत संबंधित अधिका-यांकडे तक्रार करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीमधील अग्नीशमन यंत्राच्या कालबाह्यतेबाबत जिल्हा अध्यक्ष, ग्राहक न्याय परिषद यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी जिल्हा न्यायालय प्रबंधकांना व दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना निवेदन देऊन आवश्यक उपाययोजना करण्याबाबत विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर इमारतीत नवीन अग्निशमन यंत्रे बसविण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) नागपूर जिल्हा न्यायालयाच्या ईमारतीमध्ये न्यायाधिश, वकिल, पक्षकार, न्यायालयीन कर्मचारी, पोलीस यांच्यासह हजारो नागरीकांचा वावर आहे हे खरे आहे. मात्र इमारतीमधील बहुतांश अग्नीशमन यंत्रे कालबाह्य झाली आहे तसेच त्याबाबत संबंधित अधिका-यांकडे तक्रार करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे नाही

जिल्हा न्यायालय नागपुर येथे सार्वजनिक बांणकाम विभाग, नागपूर यांच्याकडून दिनांक १४/०८/२०१६ रोजी अग्निशमन यंत्र बसविण्यात आले होते व त्यावर त्यांची कालबाहय मुदत १४/०८/२०१७ पर्यंत लिहीलेली होती. अग्नीशमन यंत्राची मुदत संपण्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास ते बदलवून दूसरे नवीन अग्नीशमन यंत्र बसवून देण्याचे किंवा त्यांची पुनर्भरणी करण्याचे मौखिक आदेश दिले होते. जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर येथे बसविण्यात आलेली अग्नीशमन यंत्रे अद्ययावत तंत्रज्ञानाने बनविलेली असून त्यांचा वापर जोपर्यंत करण्यात येत नाही तोपर्यंत ती कालबाहय ठरणार नाहीत, चूकीने या यंत्रावर एक वर्षाचा वॉरंटी कालावधी टाकण्याऐवजी मुदतबाहय तारीख टाकण्यात आली असून ती चूक आता कंपनीतर्फे दूरूस्त करण्यात आल्याचा खूलासा अग्नीशमन यंत्रे बसविणारी कंपनी व्ही.के.एंटरप्रायजेस, नागपूर यांनी केला आहे.

(२) जिल्हा अध्यक्ष, ग्राहक न्याय परीषद यांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी जिल्हा न्यायालय प्रबंधकांना व दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी मूख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना निवेदन दिलेले आहे.

(३) अग्नीशमन यंत्राचा वापर करण्यात न आल्याने ती कालबाह्य ठरलेली नाहीत. यास्तव चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सन २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या विविध परीक्षांचे निकाल अद्यापही जाहिर केलेले नसल्याबाबत**

**(३३) ११७०६० (२६-०७-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सन २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षेसह विविध दहा परीक्षांचे निकाल अद्यापही जाहिर केलेले नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ च्या परीक्षांसाठी जाहिरात प्रसिध्द झाल्याने परिक्षार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे,

(३) असल्यास, त्यामुळे सन २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांचे निकाल लवकरात लवकर जाहिर करण्यासंदर्भात राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२), (३) व (४) मा. उच्च न्यायालयाने समांतर आरक्षणासंबंधीच्या जनहित याचिका क्र.९/२०१८ मध्ये दि.१७.१.२०१८ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास परीक्षांचे निकाल घोषित करण्यासाठी स्थगिती दिली होती. दि.१.३.२०१८ रोजी मा. उच्च न्यायालयाने अंतिम आदेश पारित करुन अंतरिम दिलासा (Interim relief) साठी मा. प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे अर्ज करण्याचे निर्देश दिले

मा. प्रशासकीय न्यायाधिकरणाने प्रस्तुत मुळ अर्जावर स्थगिती दिली नाही त्यामुळे

१. राज्यसेवा परीक्षा-२०१७,

२. पोलिस उपनिरीक्षक परीक्षा-२०१६,

३. पोलिस उपनिरीक्षक परीक्षा-२०१७,

४. सहायक कक्ष अधिकारी परीक्षा-२०१७,

५. राज्य कर निरीक्षक परीक्षा-२०१७,

६. कर सहायक परीक्षा-२०१७,

७. लिपिक-टंकलेखक परीक्षा-२०१७,

८. महाराष्ट्र वन सेवा परीक्षा-२०१७,

९. महाराष्ट्र कृषि सेवा परीक्षा-२०१७ व

१०.महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी परीक्षा २०१७ या परीक्षांचे निकालांपैकी महाराष्ट्र अभियांत्रिकी परीक्षा-२०१७ वगळता उर्वरित ९ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र अभियांत्रिकी परीक्षेचा निकाल न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने घोषित करण्यात आलेला नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील गॅस लाईनसाठी जमीन देण्यास शेतकऱ्यांचा असलेला विरोध**

**(३४) ११७९४० (०४-०८-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे रिलायन्सच्या गॅसलाईनसाठी भूसंपादनाला विरोध करणाऱ्या गावकऱ्यांना फरपटत नेऊन पोलीस ठाण्यात डांबणे, शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढण्यासाठी त्यांना पोलीस वाहनामध्ये डांबून अन्नपाण्या वाचून त्यांचा दिवसभर छळ करण्यात येत असल्याचा संतापजनक प्रकार माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तदनुसार याप्रकरणी संबंधित पोलीसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे शहरातील अनधिकृत वाहन तळाबाबत**

**(३५) ११८३५९ (३०-०७-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील नेहमीच गजबजलेल्या टीपटॉप प्लाझा, रहेजा, चेकनाका, सिंधुदुर्ग हॉटेल, वागळे प्रभाग समिती, रोड नं.१६ इ. परिसरात उघडपणे चारचाकी वाहने, अवजड वाहतुक करणारे ट्रक बेकायदेशीरपणे पार्कींग करत असल्याने नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याप्रकरणी पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा यांचेकडे दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास तसेच त्यापुर्वीही वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर परिसरातील नेहमीच निर्माण होत असलेली वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्यासंदर्भात अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
एलबीएस रोड, टिपटॉप प्लाझा, रहेजा चेकनाका, सिंधुदुर्ग हॉटेल, वागळे प्रभाग समिती, रोड नं. १६ इ. परिसरात ट्रक टेम्पो अशी वाहने उभी केली जात असल्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असल्याबाबत परिसरातील नागरीकांनी वेळोवेळी तक्रारी केल्या आहेत.
(२) ठाणे शहरातील वागळे ईस्टेट हा परिसर औद्योगिक परिसर असल्याने येथे मालाची ने-आण करण्याच्या दृष्टीने पुर्वीपासून मॉडेल चेकनाका परिसरातील जागेत व रोडच्या बाजूस ट्रक, टेम्पो अशी वाहने उभी राहात असल्याचे आढळून आले आहे. वाढती वाहनसंख्या व वाहनतळांच्या अभावामुळे काही वाहनचालक त्यांची वाहने रोडवर बेशिस्तपणे उभी करीत असल्याने वाहतूक समस्या निर्माण होते.

माहे जानेवारी, २०१८ ते दिनांक २७ जून, २०१८ पावेतो अशा एकूण ६० वाहनांवर कारवाई करण्यांत आलेली आहे. तसेच परिसरातील ट्रक टेम्पो चालक मालक यांना त्यांची वाहने उभी केल्यामुळे वाहतूकीची समस्या निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घेण्याची समज देण्यांत आलेली आहे.

तसेच सदर परिसरात वाहतूक पोलीसांची दैनंदिन पेट्रोलिंग ठेवण्यांत येत असून वाहतूकीस अडथळा होईल अशा वाहनांवर कायदेशीर कारवाई करण्यांत येत आहे. तसेच वाहतूक सुरळीत राहील याची दक्षता घेण्यांत येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापुरे (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) गावातील आदिवासी महिलेचे नवजात अर्भक नरबळीसाठी पळविल्याबाबत**

**(३६) ११८४३९ (३०-०७-२०१८). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापुरे (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) गावातील आदिवासी महिलेचे नरबळी देण्याचे उद्देशाने पळविलेले नवजात बाळ पाच कुंडल्याचीवाडी येथील घनदाट जंगलात घोटी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापडल्याचे दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणाची सखोल चौकशी केली असता सदर बालक हे वनविभागाच्या डोंगरात तिचे चुलते यांना सूखरुप मिळून आले आहे. त्या मुलीच्या आई वडील यांची चौकशी केली असता त्यांनी संशयास्पद असा कोणताही प्रकार घडलेला नसल्याचे सांगितले आहे.

सदर प्रकरणी कोणीही फिर्याद देण्यास न आल्याने सहा. पोलीस निरीक्षक यांनी सरकार तर्फे फिर्याद देऊन घोटी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८४/२०१८ भा.दं.वि.स. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) शहरात एका लहान मुलाचे झालेले अपहरण**

**(३७) ११९३४८ (३०-०७-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) या शहरात दिनांक १९ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास एक वर्षाच्या मुलाचे मालदा शिवार गट क्रमांक ५१ बेकरीच्या मागील बाजूने अपहरण करण्यात आल्या प्रकरणी पवार वाडी पोलीस स्टेशनला दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास तक्रार करण्यात येऊनही अद्यापी सदर मुलाचा शोध लागला नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुलाचा शोध घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) व (२) म्हाळदे शिवार गट क्रमांक ५१ बेकरीच्या मागे मालेगाव येथून फिर्यादी यांच्या ८ वर्षाच्या मुलास दि.१९.०२.२०१८ रोजी अज्ञात इसमाने पळवून नेल्याप्रकरणी आरोपींविरूध्द पवारवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १२/२०१८, भा.दं.वि. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अटक करण्यात आलेला संशयित इसम जामिनावर असून त्याच्याकडून उपयुक्त माहिती मिळाली नाही. सद्यस्थितित गुन्हा तपासावर आहे

मुलाच्या शोध घेण्यासाठी जिल्हयात व जिल्हयाबाहेर याद्या पाठविण्यात आल्या असून वर्तमानपत्रांमध्ये याबाबत माहिती प्रसारित करण्यात आली आहे. रेल्वे स्टेशन, बस स्थानके, बाजार, गर्दीची ठिकाणे येथे मुलाचे फोटो असलेले पोस्टर लावण्यात आले आहेत. अनाथाश्रम, रिमांड होम, दवाखाने याठिकाणी मुलाचा शोध घेण्यात आला असून मुलाची माहिती सोशल मिडीयावर प्रसारित करण्यात आली आहे. तसेच हरविलेल्या बालकाच्या तपासासंदर्भात सुचना (SOP) प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्हयाच्या तपासासाठी विशेष तपास पथक नेमण्यात आले आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) या शहरातील वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत**

**(३८) ११९३६२ (३०-०७-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) या शहरात मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत असून दिवसेंदिवस वाढतच आहे तसेच शहरात व परिसरात तिसपेक्षा अधिक शाळा असून बेशिस्त वाहतुकीमुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालेगाव शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

मालेगांव शहराची सातत्याने वाढणारी लोकसंख्या व त्याबरोबर वाढणारी वाहन संख्या तसेच रस्त्यांवरील अतिक्रमणामुळे वाहतूक व्यवस्थापनाची समस्या निर्माण झाली आहे. तसेच जुन्या मुंबई आग्रा रोडवरील नविन बस स्टँडसमोर उड्डाणपुलाचे बांधकाम सुरु असल्यामुळे सदर रस्ता अरुंद होऊन बसस्टँड परिसरात वाहतूक व्यवस्थापनाची समस्या निर्माण झाली आहे.

(२) मालेगांव शहरातील वर्दळीच्या ठिकाणी व जास्त शाळा असलेल्या परिसरात, नविन बस स्टँडजवळ, रामसेतू, मोसमपूल येथे वाहतूक नियमनासाठी दररोज वाहतूक पोलीस नेमण्यांत येतात. त्यांना शाळेच्या वेळेत विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देण्याबाबत सूचना देण्यांत आल्या आहेत. वाहतूकीची कोंडी निर्माण झाल्यास तात्काळ जास्तीत जास्त वाहतूक पोलीस नेमून व पर्यायी मार्गाने वाहतूक वळवून वाहतुक कोंडी सोडविण्यांत येते.

शहरामध्ये दिनांक २३.०४.२०१८ ते दिनांक ०७.०५.२०१८ या कालावधीत दरवर्षीप्रमाणे रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यांत आले. यादरम्यान रस्तासुरक्षा व वाहतूक नियम याविषयी जनजागृती मोहिम राबविण्यांत आली.

माहे जानेवारी, २०१८ ते मे, २०१८ या कालावधीत अवैध प्रवासी वाहतूकीच्या ८६ तर ड्रंक अँड ड्राईव्हच्या १२ केसेस आणि मोटार वाहन कायद्यान्वये ३,१८४ तडजोडीच्या केसेस करुन रु. ६,३४,५००/- इतकी तडजोड शुल्क आकारण्यांत आली. तसेच शहरातील वाहतूक नियोजन आणि रस्त्यांवरील अतिक्रमणासंबंधी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत महानगरपालिकेस सूचित करण्यांत येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधिमंडळ व संसद सदस्यांच्या पत्र व्यवहारास प्रतिसाद देण्याबाबत शासनाने काढलेल्या परिपत्रकाचे वरिष्ठ शासकीय अधिकारी उल्लंघन करीत असल्याबाबत**

**(३९) ११९९९३ (२६-०७-२०१८). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र. वि.मं.स. -२०१३/प्र. क्र. ६७/१८ (र. व का.) दि. २७ जुलै २०१५ नुसार परिपत्रक काढून संसद सदस्य व विधिमंडळ सदस्यांच्या पत्र व्यवहारास पोहोच देणे, कार्यवाही करून उत्तर देणे, केलेल्या अथवा करीत असलेल्या कार्यवाहीबाबत अवगत करणे, सदस्यांनी सुचविलेल्या विकास कामांच्या व इतर कार्यक्रमाच्या उद्घाटनास सदस्यांना निमंत्रित करणे इत्यादीबाबत सूचना देऊन त्या सूचनांचे उल्लंघन झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करून केलेल्या कारवाईची संबधीत अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेण्यात यावी, असे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त व संबंधित खातेप्रमुख हे विधिमंडळ सदस्यांच्या पत्रांची दखल घेत नाहीत ही बाब विधिमंडळ सदस्यांनी लेखी पत्राद्वारे महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव व महापालिका आयुक्त यांच्या निदर्शनास आणून दिली असूनही आजपर्यंत मुख्य सचिव व महापालिका आयुक्तांनी एकही शिस्तभंगाची कारवाई करून त्याची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तिकेत घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त (प.उ.) श्रीमती आय.ए. कुंदन यांच्याविरुद्ध स्थानिक विधिमंडळ सदस्यांनी दिनांक १५ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांकडे शिस्तभंगाची कारवाई करण्याचे प्रस्तावित केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या काढलेल्या परिपत्रकाची शासनाचे मुख्य सचिव व महापालिका आयुक्त कोणतीच दखल घेत नाहीत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) शासन परिपत्रक दिनाक २७ जुलै,२०१५ अन्वये विधानमंडळ/संसद सदस्यांना सन्मानाची वागणूक देणे, त्यांच्याकडून आलेल्या पत्रांना पोच देणे, त्यावर सत्वर कार्यवाही करणे, शासकीय कार्यक्रमांना लोकप्रतिनिधींना आमंत्रित करणे, त्यांचे नांव निमंत्रण पत्रिकेवर छापणे इ.बाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत. या परिपत्रकान्चये देण्यात आलेल्या सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(२) शासन परिपत्रक, दिनांक २७.०७.२०१५ अन्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून सर्व सहाय्यक आयुक्त/खाते प्रमुखांना परिपत्रक, क्रमांक एमओएम/२०५२ए दिनांक ०४.१२.२०१५ अन्वये देण्यात आले आहेत.

(३) यानुषंगाने सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.रमेश लटके यांचे दिनांक १५.०३.२०१८ चे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.

(४) सन्माननीय विधानसभा सदस्य यांच्या अतिरिक्त आयुक्त (प.उ.),बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या विरुध्द मा.मुख्य सचिव यांना पाठविलेल्या दिनांक १५.०३.२०१८ च्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित अतिरिक्त आयुक्त (प.उ.), बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून अभिप्राय (खुलासा) मागविण्यात आले. यानुषंगाने प्राप्त अभिप्रायानुसार सन्माननीय विधानसभा सदस्यांनी पाठविलेली दोन विषयाबाबतची पत्रे अतिरिक्त आयुक्त (प.उ.), बृहन्मुंबई महानगरपालिका यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर पत्रे आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधित खाते/विभाग कार्यालयांना पाठविली आहेत.

यापैकी एका पत्रात नमूद महानगरपालिकेतील अधिकाऱ्याच्या झालेल्या बदलीच्या अनुषंगाने मा.विधानसभा सदस्य यांनी पाठविलेल्या पत्रावर नगर अभियंता यांनी सन्माननीय विधानसभा सदस्य यांना दिनांक ०३.०७.२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

अन्य एका मौजे मोगरा ह्या भुखंडावरील मंडईच्या पुर्नविकासाच्या प्रस्तावाबाबत मा.विधानसभा सदस्य यांनी महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार केला आहे. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे आदेश व मा. राज्यमंत्री यांचे सुनावणीतील आदेश यानुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना क्षेत्रीय खाते/विभाग कार्यालयाकडून प्रस्ताव सादर करण्यात आला. याबाबत विकासकाने अटींची पूर्तता न केल्यामुळे सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आल्याचे संबंधित विकासकास दिनांक ०२.०७.२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

यानुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सन्माननीय विधानसभा सदस्य यांना उत्तर पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खोपोली शहरात (जि.रायगड) सुप्रीम स्टील कारखान्यातील कामगारांना कोणतीही पुर्वसूचना न देता कामावरुन कमी केल्याबाबत

**(४०) १२०७९४ (२६-०७-२०१८). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली शहरात (जि.रायगड) मे.सुप्रीम स्पेशल स्टील कंपनीत सलग दहा वर्ष काम करणाऱ्या कामगारांना कोणतीही पुर्वसूचना न देता ५० कामगारांना माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तडकाफडकी कामावरुन कमी करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे कामगार व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आल्याने या विरोधात कामगार व त्यांच्या कुटुंबियांनी सदरहू कंपनीसमोर तीव्र आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कंपनी विरोधात कारवाई करण्याबाबत व कामगारांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (११-०९-२०१८) :** (१) व (२) अशंत: खरे आहे.

मे.सुप्रीम स्पेशल स्टील कंपनीतील ४८ कंत्राटी कामगारांना सदर आस्थापनेने दिनांक १७/०२/२०१८ रोजी कामावरुन कमी केले होते.त्याविरुध्द कामगारांनी दिनांक २३ व २४ मार्च,२०१८ रोजी आस्थापनेसमोर उपोषण केले होते.

(३) या संदर्भात दिनांक २४/०३/२०१८ रोजी तहसिलदार, खालापुर यांच्या कार्यालयात सर्व संबंधितांच्या झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार कामगारांनी दिनांक २४/०३/२०१८ रोजी उपोषण मागे घेतले होते.त्यानंतर दिनांक २८/०३/२०१८ रोजी ४५ कंत्राटी कामगारांना आस्थापनेने कामावर घेतले असून उर्वरित ३ कंत्राटी कामगार स्वेच्छेने काम सोडून गेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोट ते अकोला (जि.अकोला) रस्त्यावर वेताळबाबा संस्थानाजवळ लक्झरी बसला झालेला अपघात**

**(४१) १२११३३ (०३-०८-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट ते अकोला (जि.अकोला) या महामार्गावर वेताळबाबा संस्थानाजवळ राणी ट्रॅव्हल्सची बस उलटून माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान अपघात झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम संथ गतीने सुरु असल्याने व मार्गामध्ये अनेक ठिकाणी खड्डे खोदले असल्याने वारंवार अपघात घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपघातग्रस्तांना वा त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत व महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) अकोट ते अकोला रोडवरील वेताळबाबा संस्थान येथे दिनांक ३०.०४.२०१८ रोजी अकोला येथून अकोटकडे जाणारी राणी ट्रॅव्हल्सची लक्झरी बस उलटल्यामुळे अपघात झाला आहे. सदर अपघातामध्ये एकूण १६ प्रवासी जखमी झाले आहेत.

(२) सदर मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम टप्प्याटप्प्याने सुरु आहे. मात्र सदर अपघाताच्या घटनास्थळीच्या रस्त्याचे काम सुरु झालेले नाही. रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी जसे सूचना फलक, माहिती फलक, दिशादर्शक फलक, तात्पुरते कठडे इ. लावण्यांत आलेली आहेत.

या मार्गावर सन २०१६ मध्ये ३३, सन २०१७ मध्ये ३९ तर माहे मे, २०१८ पर्यंत १५ अपघात घडले आहेत. नमूद अपघात हा चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे निष्पन्न झाले असून त्याविरुध्द दहिहांडा पोलीस स्टेशन येथे अप. क्र.११५/२०१८, भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ४२७ सह मोटार वाहन कायदा कलम १८७ अन्वये गुन्हा दाखल करण्यांत आला आहे.

(३) सदरची घटना ही नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने अपघातग्रस्तांना आर्थिक मदत देण्यांत आलेली नाही.

नमूद मार्गाचे चौपदीकरण लवकरात लवकर व योग्य रितीने होण्याबाबत राष्ट्रीय महामार्ग मंडळ, नागपूर या कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यांत आला आहे. रस्त्याचे काम पुर्ण करण्याकरीता कंत्राटदारास निविदा शर्तीनुसार संबंधित कार्यालयाकडून सूचना देण्यांत आल्या असून काम पूर्ण करण्याच्या कालावधीमध्ये म्हणजे माहे ऑगस्ट, २०१९ पर्यंत काम पुर्ण करुन घेण्यांत येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिर्डी, धुळे, अमरावती व कराड या विमानतळावर हवाई उड्डाण प्रशिक्षण संस्था सुरु करण्याबाबत

**(४२) १२१२९७ (२५-०७-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्रात विमानतळ विकास कंपनीच्या वतीने (एमएडीसी) शिर्डी, धुळे, अमरावती व कराड या विमानतळावर हवाई उड्डाण प्रशिक्षण संस्था सुरु करण्याच्या प्रस्तावाला शासनाने तत्वत: मान्यता दिली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या तिस-या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (६-०९-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे विविध अधिका-यांच्या पदांसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेबाबत

**(४३) १२१५७१ (२६-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात विविध अधिका-यांच्या सुमारे ४०० पदासाठी घेण्यात येणारी परिक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत केवळ ६९ पदासाठी घेण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोग चार लाख बेरोजगारांच्या भवितव्याशी खेळ करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दरवर्षी अपेक्षीत असलेली अधिका-यांची ५०० पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१८) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेमधून भरावयाच्या गट-अ व गट-ब संवर्गातील एकूण ६९ पदांवरील भरतीसाठी आयोगामार्फत दिनांक २९ डिसेंबर, २०१७ जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून त्यास अनुसरुन दि. ८ एप्रिल, २०१८ रोजी राज्यसेवा पूर्व परीक्षा २०१८ मुंबईसह ३७ जिल्हाकेंद्रांवर आयोजित करण्यात आली. प्रस्तुत पूर्व परीक्षेनंतर एकूण ६७ पदांचे मागणीपत्र आयोगास प्राप्त झाले. पदसंख्येत झालेल्या बदलाबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर दि. १४ जून, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. पूर्व परीक्षेनंतर ६७ पदांसह एकूण १३६ पदांकरीता आयोगाच्या संभाव्य वेळापत्रकानुसार दि. १८,१९ व २० ऑगस्ट, २०१८ रोजी मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या जिल्हा केंद्रावर घेण्यात आली. गत पाच वर्षापासून राज्य सेवेच्या पूर्व परीक्षेच्या जाहिरातीतील पदसंख्येत नंतर मुख्य परीक्षेच्या जाहिरातीपर्यंत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. दीर्घकालीन वित्तीय स्थैर्यासाठी वेतनवाढीचा सरासरी दर हा महसूल वाढीच्या दरापेक्षा अधिक असता कामा नये हे सर्वसामान्य तत्व पाळणे आवश्यक असल्याने शासन निर्णय दि. २ जून, २०१५ व त्यानंतर वेळोवेळी सुधारणा करुन पदभरतीस निर्बंध विचारात घेऊन सद्यस्थितीत पदभरती चालु असल्याने पद भरण्यास अत्यंत कमी पदे उपलब्ध होत आहेत. परिणामी आयोगाकडे मर्यादित पदांची मागणी नोंदविली जाते..
विलंब झालेला नाही.

---

## उरण (जि.रायगड) येथील जवाहरलाल नेहरु बंदरातील (जेएनपीटी) स्थानिक वाहतूकदारांच्या असहकार आंदोलनाबाबत

**(४४) १२१५८८ (३०-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) येथील जवाहरलाल नेहरु बंदरातील (जेएनपीटी) स्थानिक वाहतूकदारांनी दिनांक १० मे, २०१८ रोजी पासून पुकारलेल्या असहकार आंदोलनामुळे बंदराबाहेरील वाहतूक ठप्प झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंदराजवळ भाज्या, हापूस आंबे, द्राक्ष आणि डाळिंब यांचे ४०० कंटेनर पडून असल्यामुळे व्यापा-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने तातडीने तोडगा काढून कार्यवाही करावी, अशी मागणी व्यापा-यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
जे.एन.पी.टी. मधील स्थानिक वाहतूकदारांनी केलेल्या असहकार आंदोलनामुळे पोर्ट टर्मिनल आणि ट्रॅक्टर टेलरची वाहतूक कमी प्रमाणात सुरु होती. पोर्ट टर्मिनलवरील नियमित वाहतूकीवर कोणताही परिणाम झाला नाही.
(३) व (४) जे.एन.पी.टी.प्रशासनाने आंदोलनकर्त्यांशी केलेल्या चर्चेतील निर्णयानंतर दिनांक १३ मे, २०१८ रोजी आंदोलन मागे घेण्यात आले.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीगोंदा तालुक्यात (जि. अहमदनगर) श्रीगोंदे व बेलवंडी या दोन्ही पोलीस ठाण्यातील हद्दीत पडलेले दरोडे

**(४५) १२१६७८ (३०-०७-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा तालुक्यात (जि. अहमदनगर) श्रीगोंदे व बेलवंडी या दोन्ही पोलीस ठाण्यातील हद्दीत माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दोन दरोडे पडले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी पोलीसांनी किती जणांना अटक केली आहे,
(३) असल्यास, त्यांच्यावर कोणती कारवाई केली व केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१), (२) व (३) माहे, एप्रिल,२०१८ मध्ये बेलवंडी पोलिस ठाणे येथे गु.र.क्र.८१/१८ भा.दं.वि.स. कलम ३९५, ४५२, १४३, १४७, ३२३, ५०६, ५०४, ४२७ व गु.र.क्र.८२/१८ भा.दं.वि.स. कलम ३९५, ३५४ असे परस्पर विरोधी शेतीच्या कारणावरून तांत्रिक स्वरूपाचे दरोड्याचे दोन गुन्हे दाखल आहेत.
गु.र.क्र.८१/१८ या गुन्हयात ९ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपींना मा. न्यायालयाने अटकपूर्व जामिन मंजूर केला आहे.
गु.र.क्र.८२/१८ या गुन्हयात ११ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपींना मा.न्यायालयाने अटकपूर्व जामिन मंजूर केला आहे. सदर दोन्ही गुन्हयांचा सखोल तपास करून आरोपीतांविरूध्द दोषारोपपत्र तयार करून ते मा. न्यायालयात सादर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**नाशिक शहरातील ब्रिटीशकालीन जिल्हा न्यायालयालगतच्या भूखंडावर इमारत बांधण्याबाबत**

**(४६) १२२२९८ (२६-०७-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील ब्रिटीशकालीन जिल्हा न्यायालयाच्या इमारतीतील जागा दिवसेंदिवस वाढणा-या खटल्यामुळे अपुरी पडत असल्याने मा.जिल्हा न्यायालयाच्या इमारत उभारण्यासाठी मागणीनुसार राज्य शासनाने न्यायालयालगतचा भूखंड उपलब्ध करुन दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर नवीन इमारत बांधण्याचे काम अद्याप सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मंजूर केलेल्या भूखंडावर इमारत बांधणीच्या कामास सुरुवात न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१८) :** (१) होय, गृह विभाग, शासन निर्णय क्र. न्यायप्र १०१५/प्र.क्र.५३३(भाग २)/पोल ७, दि.१८/५/२०१७ अन्वये नाशिक येथील २.५ एकर जागा जिल्हा न्यायालय, नाशिक यांच्या विस्तारासाठी हस्तांतरीत करण्यात आली आहे.

(२) होय,

(३) न्यायालयीन इमारत बांधकाम प्रकरणी जिल्हा न्यायालयातर्फे अंदाजपत्रक व आराखडा सर्वप्रथम मा.उच्च न्यायालयाकडे सादर केला जातो. मा.उच्च न्यायालयाच्या मंजुरीनंतर प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधीसाठी शासनाकडे पाठविला जातो. प्रस्तुत प्रकरणी नवीन इमारतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## औरंगाबाद शहरातील बियर बार समोर अनधिकृतपणे दुचाकी वाहने उभी करण्यात येत असल्याबाबत

**(४७) १२३४२५ (३०-०७-२०१८). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद या शहरातील बियर बार समोर दुचाकी वाहन उभी केल्यास वाहतुक पोलीसांकडून कारवाई होत नसल्याचे दिनांक २ जून २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रुग्णालय व बँक व इतर ठिकाणी वाहने उभी केल्यास कारवाई करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१), (२) व (३) औरंगाबाद शहरातील बिअरबार समोर अनधिकृतपणे वाहतूकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनधारकांना रोडवरील वाहने हटविण्यास सांगीतले जाते. न ऐकल्यास त्यांचेवर मोटार वाहन कायदा कलम १२२/१७७ प्रमाणे कारवाई करुन तेथून वाहन उचलले जाते.

रुग्णालय, बँक व इतर ठिकाणी अनधिकृतपणे रोडवरील वाहतूकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनाधारकांवरसुध्दा उपरोक्तप्रमाणे कारवाई करण्यांत येते.

माहे जानेवारी, २०१८ ते मे, २०१८ या कालावधीत मोटार वाहन कायद्यान्वये ४,५७१ केसेस करण्यांत आल्या असून ९,३३,८००/- इतकी तडजोड रक्कम वसूल करण्यांत आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विशाळगड (ता. शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथे अनेक प्रकारचे अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(४८) १२४३४२ (३०-०७-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील विशाळगड हे एक नावाजलेले पर्यटन स्थळ असून, सदर गडास ऐतिहासिक वारसा लाभला असल्याने पर्यटकांची सतत गर्दी असते,
हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशाळगड येथे पर्यटकांकडून वादावादी व हाणामारीचे प्रकार वाढले असून गडावर अनेक प्रकरचे अवैध व्यवसाय सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या विशाळगडावरील काही पर्यटकांकडून होणारा त्रास व अवैध व्यवसायांना प्रतिबंधीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) विशाळगड येथे पर्यटकांकडून वादावादी, हाणामारी व अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत शाहुवाडी पोलिस ठाणे येथे सन २०१७ ते सन २०१८ माहे मे अखेर कोणत्याही गुन्ह्याची नोंद नसून केवळ १ केस दारूबंदी कायद्याखाली दाखल आहे.

विशाळगड येथे येणाऱ्या पर्यटकांकडून विशाळगडावरील जनतेला तसेच पर्यटकांना त्रास होवू नये याकरीता अति महत्वाच्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त नेमण्यात येत आहे. तसेच संपूर्ण विशाळगडावर व मुख्य रस्त्यावर रात्री व दिवसा पोलिस पेट्रोलिंग सुरू आहे. विशाळगडावर जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर गजापूर येथे अचानक नाकाबंदी करून सन २०१८ माहे जुन अखेर हुल्लडबाजी करणाऱ्या ३३ इसमांविरूध्द मु.पो.क.क्र.११२/११७ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच मोटार वाहन कायद्यान्वये ९ केसेस करून त्यांचेकडून दंड वसूल केला आहे. विशाळगड येथे हुल्लडबाजी करणाऱ्या पर्यटकांवर सतत कायदेशीर कारवाई करून जनतेला त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे
(४) विलंब झालेला नाही.

---

**खेर्डा बु. (ता.कारंजा, जि.वाशीम) येथे सुरु असलेल्या अवैध व्यवसायांबाबत**

**(४९) १२४४११ (३०-०७-२०१८). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेर्डा बु. (ता.कारंजा, जि.वाशीम) हे गाव कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येत असून येथे सर्वच प्रकारचे अवैध व्यवसाय उघडपणे सुरू असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कारवाई करून अवैध व्यवसाय बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) व (२) खेर्डा बु. (ता.कारंजा, जि.वाशीम) हे गाव कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येत असून येथे कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे खुलेआमपणे सुरु नाहीत. माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये खेर्डा बु. येथे अवैध व्यवसाय संबंधाने नागरीकांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

लपून छपून कोणत्याही प्रकारचा अवैध व्यवसाय सुरु असल्याची माहिती मिळाल्यानंतर अशा ठिकाणी तात्काळ छापे टाकून कारवाई करण्यात येते. फेब्रुवारी २०१८ मध्ये महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. त्यामध्ये एकूण ९ आरोपी असून एकूण रु.२०,९९०/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवळा (जि.नाशिक) शहरात भरदिवसा वेगवेगळ्या तीन ठिकाणी घरफोड्या झाल्याबाबत**

**(५०) १२४९९४ (०१-०९-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळा (जि.नाशिक) शहरात विद्यासागर, मोती नगर भागात वेगवेगळ्या तीन ठिकाणी दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास भरदिवसा घरफोड्या झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तीनही चोरींचा तपास लावण्यात पोलीसांना यश आले आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधित चोरी करणा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१), (२) व (३) फिर्यादी यांचे मोतीनगर भागातील घरी कोणीतरी अज्ञात चोरट्याने दि. १८.०४.२०१८ रोजी बंद घराचे दरवाज्याचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून रू.८५०००/- रोख व रू.१६५६१/- किंमतीचे सोन्याचे दागिने असा एकूण रू.१,०१,५६१/- चा माल चोरून नेल्याबाबत देवळा पोलिस ठाणे येथे गु.र.क्र.५८/१८ भा.दं.वि.स. कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर दिवशी एकच घरफोडी झालेली असून गुन्ह्यातील आरोपी मिळून आलेले नाहीत. सद्यस्थितित गुन्हा पोलिस तपासावर आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.